सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## संचालनालय, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य,

## कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४

☎🖷 -०२२-२७५७१३११ E.Mail:-director@mahalfa.in

क्र.स्था/१८/ब/ स्थानिले/संगणक शाखा/MAIN/१३५८ दिनांक :- 2 AUG 2013

## परिपत्रक

**विषय** :-MAIN ( Maharashtra Audit Information Network) प्रणालीच्या अनुषंगाने लेखापरीक्षण आक्षेपांची मांडणी व अहवालाचे निर्गमनाबाबत.

संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकरीता NIC, पुणे यांचेसहकार्याने विकसित करण्यात आलेल्या MAIN या लेखापरीक्षण प्रणालीचे विकसन पूर्णत्वास आलेले असून सन २०१३-१४ या आर्थिक वर्षापासून स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागातर्फे करण्यात येणारे **सन २०१२-१३ या वर्षाचे सर्व स्थानिक संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल या प्रणालीच्या माध्यमातून निर्गमित करावयाचे** या संचालनालयाने नियोजित केले आहे. याचीच पूर्व तयारी म्हणून यापुढे **सन २०१२-१३ या वर्षाच्या** लेखापरीक्षणादरम्यान अर्ध समास पत्र तसेच प्रारूप लेखापरीक्षण आक्षेप तयार करताना खालील कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

१. अर्ध समास पत्र (HMM) तसेच प्रारूप लेखापरीक्षण आक्षेप ( Draft Audit Para ) यांकरिता MAIN या प्रणालीमध्ये नमुने (Template) निश्चित करण्यात आलेले आहेत. यास्तव **सन २०१३-१४ या आर्थिक वर्षापासून लेखापरीक्षणादरम्यान अर्ध समास पत्र तसेच प्रारूप लेखापरीक्षण आक्षेप तयार करताना याच नमुन्यांचा वापर करावयाचा आहे**. हे नमुने (Template) या विभागाच्या **www.mahalfa.in** या अधिकृत संकेतस्थळावर Main Menu - Circulars & Orders - MAIN Circulars & Orders या शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

२. सदर नमुने (Template) HMM Template व Audit Para Template प्रथम संकेतस्थळावरून Download करावे. **सदर Template संगणकावर अथवा pen drive वर save करताना ते save as word Template या स्वरुपात save करावेत.** तसेच या files सर्व लेखापरीक्षकांनी त्यांच्या संग्रही pen drive अथवा इतर माध्यमांद्वारे सदैव जतन करून ठेवाव्यात. लेखापरीक्षण अहवाल Template मध्ये तयार करताना या विभागाच्या **www.mahalfa.in** या अधिकृत संकेतस्थळावर Main Menu - Circulars & Orders - MAIN Circulars & Orders या शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करावे.

३.सदर Template मधील **लाल रंगाच्या शाईने दर्शविलेल्या सर्व रकान्यातील माहिती भरणे अनिवार्य आहे**. अर्ध समास पत्र व प्रारुप लेखापरीक्षण परिच्छेद तयार करताना Template प्रमाणे सर्व मुद्देसुद व सविस्तर माहिती नमूद करुन लेखापरीक्षण परिच्छेदांचे प्रारुप **युनिकोड(मंगल फॉन्ट)** मध्ये टंकलिखीत करावे. त्यांनतर विभागाचा Section ID टाकताना पुरविण्यात आलेल्या Section list चा वापर करुन सदर Section ID टाकावेत.

(का.मा.विधाते)
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरीता.

1) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा सर्व.

2) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा सर्व.

Raj / paripatrak